मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची (Chief Minister Employment Generation Programme) या योजनेच्या शासन निर्णयात सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. मुरोनि-२०२२/प्र.क्र.१०९-अ/उद्योग-७
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक ११/११/२०२२

**संदर्भ**:-१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. मऔधो-२०१९/ प्र.क्र.६/ उद्योग-२, दि.०७/०३/२०१९

२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. योजना-२०१९/ प्र.क्र.१२१/ उद्योग-७,दि. ०१/०८/२०१९

३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१७७/ उद्योग-७,दि. ३१/०८/२०१९

४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र. योजना-२०१९/ प्र.क्र.२३०/ उद्योग-७,दि.२३/०१/२०२०

३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन शुद्धीपत्रक क्र. योजना-२०२०/प्र.क्र.१९८/ उद्योग-७, दि.०१/०२/२०२१

४) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित उच्च स्तरीय सुकाणू समितीच्या दि. २६/०८/२०२२ रोजी संपन्न बैठकीचे इतिवृत्त

५) अधिक्षकीय उद्योग अधिकारी (सीएमईजीपी), उद्योग संचालनालय यांचे पत्र क्र.उसं/ सीएमईजीपी/ शा.नि./ सुधारणा/२०२२/अ-११०७, दि. २३/०९/२०२२

**प्रस्तावना**:-

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या केंद्र शासनाच्या स्वयंरोजगार प्रोत्साहन योजनेचे मर्यादित उद्दिष्ट, होतकरू युवक-युवतींचे स्वयंरोजगार उभारणीसाठी प्राप्त होणारे मोठ्या प्रमाणातील प्रस्ताव, राज्यातील नैसर्गिक साधन संपत्ती व अंगभूत क्षमता तसेच सदर योजनेतंर्गत घेण्यात आलेला नियमित आढाव्यांनुसार सदर योजनेची राज्यात सुलभतेने व प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या दिनांक २०/०६/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता. राज्यस्तरीय सनियंत्रण समितीने केलेल्या शिफारशीनुसार, उक्त शासन निर्णयात सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव, योजनेच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सुकाणू समितीच्या दिनांक २६/०८/२०२२ बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेबाबतच्या दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीमध्ये पुढील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद</th><th>सुधारीत तरतूद</th></tr>
<tr><td>१.</td><td>मुद्दा क्र. १ (ब) पात्र मालकी घटक:- उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थानी मान्यता दिलेले बचत गट.</td><td>पात्र मालकी घटक:- उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थानी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (OPC) व मर्यादित दायित्व संस्था (LLP).</td></tr>
<tr><td>२.</td><td>मुद्दा क्र. २ (२.१) "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमा" मध्ये पात्र उद्योग/व्यवसायातंर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषी पूरक उद्योग/ व्यवसायासाठी रुपये १०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.</td><td>"मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" मध्ये पात्र उद्योग/व्यवसायातंर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषी पूरक उद्योग/ व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.</td></tr>
<tr><td>३.</td><td>मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.<br>घटकाचा प्रवर्ग/प्रभाग- अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ महिला / अपंग/ माजी सैनिक</td><td>प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.<br>घटकाचा प्रवर्ग/प्रभाग-
<table>
<tr><th>घटकाचा प्रवर्ग/ प्रभाग</th><th>घटकाची स्वगुंतवणूक</th><th colspan="2">देय अनुदान (मार्जिन मनी)</th><th colspan="2">बँक कर्ज</th></tr>
<tr><td>घटकाचा प्रभाग</td><td>---</td><td>शहरी</td><td>ग्रामीण</td><td>शहरी</td><td>ग्रामीण</td></tr>
<tr><td>अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ महिला / अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्याक</td><td>५%</td><td>२५%</td><td>३५%</td><td>७०%</td><td>६०%</td></tr>
<tr><td>उर्वरित प्रवर्ग</td><td>१०%</td><td>१५%</td><td>२५%</td><td>७५%</td><td>६५%</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>४.</td><td>मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका- येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.</td><td>मुद्दा क्र.३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :- "मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम" अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका- येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.</td></tr>
<tr><td>५.</td><td>मुद्दा क्र. ३ (३.२.२) :- योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणा-या खर्चाबाबत तरतूद.</td><td>मुद्दा क्र.३ (३.२.२):- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या परीणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवासखर्च, पुरस्कार, कार्यशाळा / शिबीर / प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिका-यांच्या</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्याकरीता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरीता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल. |

२. उपरोक्त नमूद सुधारणांव्यतिरिक्त 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' या योजनेच्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित शासन निर्णयातील तरतूदी व कार्यप्रणाली पूर्वीप्रमाणेच राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२२१११११४१९०१००१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय देगांवकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५. मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोध पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोध पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व विभाग)
१०. विभागीय आयुक्त, कोकण विभाग/औरंगाबाद विभाग/पुणे विभाग/नाशिक विभाग/अमरावती विभाग/नागपूर विभाग.
११. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१३. सर्व जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
१४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळे/शासकीय उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी. (उद्योग संचालनालयामार्फत)
१५. उद्योग सह संचालक/अधिक्षकीय उद्योग अधिकारी, मुंबई प्राधिकरण विभाग/कोकण विभाग/ पुणे/ नाशिक/ अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर. (उद्योग संचालनालयामार्फत)
१६. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व) (उद्योग संचालनालयामार्फत)
१७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१९. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विघयो), मंत्रालय, मुंबई-३२.
२१. आदिवासी विकास विभाग (का-३), मंत्रालय, मुंबई-३२.

२२. अल्पसंख्यांक विकास विभाग (का-८), मंत्रालय, मुंबई-३२.
२३. वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई-३२.
२४. नियोजन विभाग (योजना-१४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
२५. निवड नस्ती (उद्योग-७), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.